Dowmloaded from SkillCouncils.com

# ई निविदा सुचना सन 2025-26 (प्रथम वेळ )

महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा कार्यालया अंतर्गत जिल्हा परिषद स्वउत्पन्नाचे अंदाजपत्रक सन 2025-26 या वर्षात मंजुर अनुदानातून ग्रामिण भागातील महिला व मुलींना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण – ब्युटी पार्लर प्रशिक्षण देणेबाबत योजना राबविण्यांत येत आहे. या संदर्भात पात्र निविदाधारक संस्था/निविदाधारक यांच्याकडून ऑनलाईन पध्दतीने ई निविदाव्दारे निविदा मागविण्यांत येत आहेत. ही निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यांत आलेली आहे.याची निविदाधारक यांनी नोंद घ्यावी. निविदाधारक यांनी शासनाच्या वेबसाईटवरून जाहिरातीचा नमुना डाऊनलोड (download) करून घ्यावा निविदेतील अटी व शर्तीनुसार आवश्यक ते कागदपत्रे वेबसाईटवर अपलोड (Upload) करावे.याबाबत खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्यांत येत आहे.

- जाहिरात प्रसिध्दी दिनांक : / /2025
- कागदपत्रे डाऊनलोड करण्याची दिनांक - / /2025 ते दि. / /2025 (सायं.5.00 वा पर्यंत)
- कागदपत्रे डाऊनलोड करून भरण्याची अंतिम दिनांक : / /2025 (सायं.5.00 वा पर्यंत)
- निविदा उघडण्याची दिनांक : / /2025 (सायं.5.00 वा) काही अडचण असल्यास तारीख किंवा वेळ कार्यालयाने ठरवून दिलेल्या वेळेत होईल.

**निविदा तपशिल:**

| अ.क्र. | तपशिल | निविदेची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम (EMD) | निविदा फार्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प.सेसफंड अंतर्गत ग्रामिण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण ब्युटी पार्लर प्रशिक्षण देणे | रू.3521141/- (अक्षरी रूपये पसतीस लक्ष एकविस हजार एकशे एकेचाळीस फक्त) | रू.1,00,000/- (अक्षरी रूपये एक लक्ष फक्त) | रू.6000/- (अक्षरी रूपये सहा हजार फक्त) |

-

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क)
जिल्हा परिषद, बुलढाणा

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलढाणा

Downloaded from SkillCouncils.com

# महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा

**योजना – जि.प.सेसफंड योजना अंतर्गत ग्रामिण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण – ब्युटी पार्लर प्रशिक्षण देणे**

सर्व निविदा प्रक्रिया फक्त ई -निविदा वर अपलोड करणे बंधनकारक आहे व त्याबाबतची संपुर्ण कार्यवाही फक्त ई – निविदेव्दारे www.mahatenders.gov.in वर असून निविदा स्विकृतीसाठी तांत्रिक बाबीचे कागदपत्रे PDF मध्येच फक्त ई निविदाव्दारे अपलोड करण्यांत यावेत.

**ई निविदासोबत खालील कागदपत्रे असणे बंधनकारक राहील – तांत्रिक लिफाफा**

1.निविदाधारक संस्थेकडे प्रस्तावित प्रशिक्षण घेणेसाठी स्किल इंडिया /State Skill Counsil यांचेकडील नोंदणी असल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक असून निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील.

2. निविदामध्ये सहभाग घेणाऱ्या संस्थेस सन 2022-23/2023-24/2024-25 चे आयकर निपटारा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

3. निविदाधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड क्रमांक प्रत, सन 2024-25 चे व्यवसायकर प्रमाणपत्र जोडावे.

4.निविदाधारक यांनी लगतच्या तिमाहीचे GST भरणा केल्याबाबतची पावती निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील.

5.निविदाधारक यांचे केंद्र शासन अथवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत समावेश केलेला नसावा. तसेच कोणत्याही विभागामार्फत कोणत्याही प्रकारची चौकशी सुरू नसावी याबाबत स्वयंघोषणा प्रमाणपत्र रूपये 500/- चे मुद्रांक कागदावर सादर करण्यांत येऊन निविदेसोबत जोडण्यांत यावे.

6.निविदाधारकाने संस्थेची सन 2022-23/2023-24/2024-25 या तीन वर्षातील वार्षिक उलाढाल ही ई निविदा रक्कमेच्या किमान सरासरी 50% असलेबाबत सनदी लेखापाल (C.A.) यांचे प्रमाणपत्र (UDIN सह) निविदेसोबत जोडण्यांत यावे.

7.निविदाधारकाने अनुभव म्हणुन लगतच्या 3 वर्षात निविदा रक्कमेच्या किमान 50% रक्कमेचे काम केल्याचा शासकीय/निमशासकीय विभागात ब्युटी पार्लर/ब्युटी थेरापिस्ट विषयक प्रशिक्षण देण्याचे काम पुर्ण केल्याबाबत कार्यारंभ आदेश किंवा अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

8.निविदाधारक यांनी निविदासोबत सादर करावयाचे सर्व कागदपत्रे हे स्व साक्षांकित करून ई निविदेसोबत दिलेल्या जागेवरच upload करावे.

9.विहित नमुन्यात 100 रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर undertaking प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

10.सदर प्रशिक्षण देण्यासाठी सक्षम व अनुभवी असलेल्या किमान 15 प्रशिक्षकाची यादी व प्रमाणपत्र निविदेसोबत जोडण्यांत यावेत.

11. निविदाधारक यांना प्रस्तावित प्रशिक्षण कामी एकुण लाभार्थींच्या 25% लाभार्थी यांना एकवेळेस प्रशिक्षण देणे कामी प्रशिक्षण साहित्य पुरेल इतके साहित्य पुरवठा करणेबाबत रक्कम रूपये 500/- च्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र जोडण्यांत यावेत.

12.निविदाधारक संस्था ही कौशल्य विकास विभाग अंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक असून त्याबाबतचे नोंदणी पत्र निविदेसोबत सादर करण्यांत यावेत.

Dowmloaded from SkillCouncils.com

**निविदेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा हे या निविदेसोबत जोडलेल्या तांत्रिक लिफाफा मध्ये दर्शविलेल्या तपशिलवार वर्णनाच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण देणाऱ्या पात्र संस्थेकडून ऑनलाईन निविदा मागविण्यांत येत आहेत.
2. निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता न करणाऱ्या निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा संपुर्ण निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रदद करण्याचा हक्क मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी राखुन ठेवला आहे.
3. एकदा निविदा सादर केल्यानंतर निविदाधारकास अर्ज देऊन निविदा माघारी घेता येणार नाही.
4. संपुर्ण जिल्हयातील लाभार्थी यांना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. लाभार्थी संख्या निविदेत दर्शविलेल्या तुलनेत लाभार्थी संख्या उपलब्धतेनुसार कमी जास्त होऊ शकते.
5. प्रशिक्षण वर्गासाठी प्रति लाभार्थी जास्तीत जास्त रूपये 5000/- इतके अनुदान देय राहील.
6. प्रशिक्षणाचा कालावधी हा किमान 120 तास प्रशिक्षण देणे बंधनकारक असून आयोजित प्रशिक्षणास आवश्यक साहित्य, प्रशिक्षण कक्ष व अनुषंगीक बाबी प्रशिक्षण करीता पुरविणे संस्थेस बंधनकारक राहील.
7. एका प्रशिक्षण वर्गासाठी कमाल 40 लांभार्थी असणे बंधनकारक राहील.तसेच प्रशिक्षण हे प्रकल्प स्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी हे निश्चित करतील त्या ठिकाणी आयोजित करणे बंधनकारक राहील.
8. निवड झालेल्या संस्थेस प्रशिक्षणार्थी पैकी किमान 10% प्रशिक्षणार्थी यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्याची हमी देणे बंधनकारक राहील अथवा प्रशिक्षणार्थी यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार करणेसाठी शासनाच्या योजनेचे अथवा बँकेचे अर्थसहाय्य मिळणेसाठी सहाय्य करणे बंधनकारक राहील.तसे न केल्यास सदर प्रशिक्षण संस्थेस भविष्यात जिल्हा परिषदेतील कोणतेही प्रशिक्षण विषयक काम देण्यांत येणार नाही.
9. कोणतेही सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही. निविदामध्ये दर्शविलेले दर हे सर्व करासह व खर्चासह नमुद करावे.
10. देयकातून शासनाच्या निर्देशानुसार TDS/GST/सुरक्षा ठेव अनामत व इतर कराची कपात करण्यांत येईल.सुरक्षा अनामत रक्कम सदर कालावधीचे लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्याशिवाय परत दिले जाणार नाही.तसेच त्या रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.
11. ज्या निविदाधारकाची ई निविदा स्विकृत होईल त्यांना शासकीय नियमाप्रमाणे होणाऱ्या मुद्रांक कागदावर (Stamp Paper) करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
12. निविदेतील मंजुर दर जिल्हा परिषदेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर करारनामा करण्यांत आलेल्या तारखेपासुन पुढील एक वर्षाकरीता बंधनकारक राहतील.करारनामा कालावधीत केंद्र शासन किंवा राज्य शासन यांचे मार्फत शासकीय दरात वाढ झाल्यास वाढीव दर वेगळा देण्यांत येणार नाही.

Downloaded from SkillCouncils.com

13. निविदेतील अटी व शर्ती मध्ये बदल अथवा शिथील करण्यांचा संपुर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे राखून ठेवण्यांत येत आहे.
14. फक्त ई निविदा www.mahatenders.gov.in वरिल निविदाव्दारे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचाच विचार केला जाईल. कार्यालयास परस्पर दिलेल्या प्रस्तावाचा तसेच या पुर्वी सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार संस्था निश्चितीसाठी केला जाणार नाही.
15. ई निविदा पोर्टलवरील निविदा बाबतीत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.याबाबत न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास सदर प्रकरण बुलढाणा येथील न्यायालय कार्यक्षेत्रातच दाखल होऊ शकतील.
16. शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले धोरण बदल हे निवड संस्थेवर बंधनकारक राहतील.
17. निवड झालेल्या संस्थेस प्रशिक्षण राबवितांना प्रत्येक प्रशिक्षण वर्ग सुरू असलेबाबत व लाभार्थी उपस्थितीबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना अवगत करणे बंधनकारक राहील.
18. निविदाधारक हा तांत्रिक बाबतीत पात्र असलेल्या निविदाधारकाचा व्यापारी लिफाफा उघडण्यांत येईल.
19. आवश्यकते प्रमाणे ई निविदा पोर्टलवर Upload केलेले सर्व दस्ताऐवजचे मुळ कागदपत्रे (Original Paper) विभागास/कार्यालयास तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहतील.

१. निविदासाठी आवश्यक असलेले बयाना रक्कम (EMD) रूपये 100000/---- व निविदा शुल्क रूपये ---6000/--- हे ई निविदा पोर्टलवरच Online पध्दतीने कार्यालयाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचे खात्यामध्ये भरणा करणे बंधनकारक राहील. (कार्यालयाचे **SBI ONLINE AC.NO. 31745205434)**

20. प्रस्तावित प्रशिक्षणाची अंमलबजावणी ही जिल्हा परीषद,बुलढाणा अंतर्गत कार्यरत असलेले एकुण 14 एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प स्तरावरुन निश्चित केलेल्या स्थळावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे नियंत्रणाखाली पुर्ण करण्यात येईल.
21. प्रशिक्षण किट(साहीत्य)निविदाधारक यांनी प्रस्तावित प्रशिक्षणाअंतर्गत दयावयाचे प्रशिक्षण किट मध्ये प्रशिक्षण अभ्यासक्रत पुस्तिका (मराठी)वही ,पेन,प्रकल्प अहवाल,MSMEसबसिडी माहीती पुस्तिका व इतर आवश्यक साहित्याचा समावेश असावा.
22. उपलब्ध निधीनुसार सदर प्रशिक्षणाचे देयक पारीत करण्यात येईल व दिरंगाईबाबत कोणतेही व्याज देय राहण्यार नाही.
23. संपुर्ण प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बुलढाणा यांनी राखुन ठेवले आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क)
जिल्हा परिषद, बुलढाणा

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलढाणा

Dowmloaded from SkillCouncils.com

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीबाबत बंधपत्र**

(महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा)

यांची ई निविदा पोर्टलवर प्रसिध्द केलेली Bid चे प्रथम प्रसारण

मी /आम्ही गांभिर्यपुर्वक नमुद करतो की मी/आम्ही वर नमुद केलेल्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचला असून या निविदेसाठी माझे/आमचे दर (Rate) निविदेत असलेल्या व्यापारी लिफाफा मध्ये नमुद करीता आहे/आहोत.

जर माझी / आमची निविदा स्विकृत करण्यांत आली तरी या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यांस मी / आम्ही बंधनकारक राहू या अटी व शर्तीचा भंग मी /आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी /आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

ही निविदा स्विकृत झाल्यास मी / आम्ही दिलेले दर हे एक वर्ष पर्यंत अंमलात राहतील व या मुदतीत हे दर स्विकृत केले गेल्यास त्या दराने प्रशिक्षण देण्यास मी / आम्ही बांधील राहू. हे आम्हाला व आमच्या संस्थेस मान्य आहे.

मी /आम्ही निविदेतील दिलेले प्रशिक्षण निविदा फार्म मधील तपशिलानुसार व अटी व शर्ती नुसार प्रशिक्षण पुर्ण करण्यांस बांधील राहू.

दिनांक - / / 2025

निविदाधारकाची स्वाक्षरी

संपुर्ण नांव व पत्ता

Dowmloaded from SkillCouncils.com

# Undertaking

(on a Rs.१००/- Stamp Paper)

The Information Documents submitted by us are true to the best of our knowledge and if the information/ documents so furnished shall be found to be untrue or false, our Tender bid shall be liable to be disqualified and our earnest money accompanying the tender will be forfeited.

The specification , conditions about the work provided in the tender have been carefully studied and understood by me/us before submitting this tender . I/We undertake to provide material as per the tender or provided by the chief Executive Officer , Zilla parishad ,Buldhana or his duly authorized officer, before starting the work and to abide by his decision.

I/we agree that the amount of Earnest money shall not bear interest and shall be forfeited to the women & child Development , Zilla Parishad , Buldhana. should I /we fail to (i) Abide by the stipulation to keep the offer open for writing duly addressed to the authority opening the tenders and (ii) security deposit as specified in schedule and within the time limit laid down in clause ५ of detailed Tender Notice. The amount of earnest money may be adjusted towards the security deposit or refunded to me/us if so desired by me/us in writing unless the same or any part thereof has been forfeit as aforesaid.

Should this tender be accepted I/we hereby agree to abide by and fulfill all the terms and provisions of the conditions of contract annexed hereto so far as applicable and in default there of to forfeited and pay to zillha parishad, Buldhana the sums of money mentioned in the said conditions

Demand draft No.--------------------Dated -------------------- from the Nationalized /Scheduled Bank at ------------------------- in respect of the sum Rs.-------------- is herewith forwarded representing the Earnest money the full value of which is to be absolutely forfeited to zilla Parishad Buldhana Should I/we not Deposit the full amount of security deposit specified in the detailed Tender Notice

Tenderer -----------------------

Address-----------------------

Date the -----------------Day of -----------२०२३ Signiture of Tenderer

Witness-------------------------------------

Address-------------------------------------

Date the -----------------Day of -----------२०२३ Signiture of Witness